असा. क्र. २५५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२०००

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

शुक्रवार, ऑगस्ट २५, २०००/भाद्र ३, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ ऑगस्ट २०००

### अधिसूचना

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्हीपीएम. २६९९/सीआर १०७१/२२—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम तीन) याच्या कलम १७६ च्या पोट-कलम (२) चे खंड (छत्तीस) आणि कलम १३३ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने जे नियम करण्याचे ठरविले आहे, त्या नियमाचा पुढील मसुदा उक्त कलम १७६ च्या पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे त्यामुळे बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, हा मसुदा दिनांक २८ सप्टेंबर २००० रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती व सूचना सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे उपरोक्त तारखेपूर्वी येतील त्या महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

## नियमाचा मसुदा

१. या नियमांना मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) नियम २००० असे म्हणता येईल.

२. सदर नियमाच्या नियम ११ मधील पोट-नियम (३) ऐवजी खालील पोट-नियम (३) दाखल करण्यात यावा.

"(३) तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर ग्रामपंचायतीला तिच्या अलीकडील तीन आर्थिक वर्षांच्या सरासरी शिलकी उत्पन्नाच्या २० पट व उत्पादक कामे घेतल्यास ३० पट इतक्या रकमेचे कर्ज निधीमधून देता येईल.

परंतु :—

(अ) कर्जाची रक्कम निधितून उपलब्ध असली पाहिजे.

(ब) पंचायतीला निधीमधून आगाऊ दिलेली व कर्जाची रक्कम ही तिच्या अलीकडील तीन आर्थिक वर्षांच्या सरासरी शिलकी उत्पन्नाच्या २० पट व उत्पादक कामे घेतल्यास ३० पटीपेक्षा अधिक असता कामा नये.

(क) कर्जाची रक्कम ६०,००० रुपयांहून अधिक असता कामा नये.

(ड) कर्जाची रक्कम ६०,००० रुपयांहून अधिक असेल तर, त्याबाबतीत क[illegible] परिषदेने पूर्व संमती दिलेली असली पाहिजे.

(ई) मागील तीन वर्षांचे सरासरी एवढ्या काढलेल्या रकमेच्या दीडपटपेक्षा जास्त रक्कम चालू खात्यामध्ये असता कामा नये.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**कुंदा गोसावी,**
शासनाच्या उप सचिव.

Scanned with OKEN Scanner

## RURAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 25th August 2000

*NOTIFICATION*

BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

No. VPM. 2699/CR-1072/22.—The following draft of rules further to amend the Bombay District Village Development Fund Rules, 1960, which the Government of Maharashtra proposes to make, in exercise of the powers conferred by clause (xxxvi) of sub-section (*2*) of section 176, read withSection 133 of the Bomby Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*4*) of the said section 176, for the information of all persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Gonvernment of Maharashtra on or after the 28th day of September 2000.

Any objections or suggesions which may be received by the Secretary to the Government of Maharashtra, Rural Development and Water Conservation Department, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft before the aforesaid date, will be considered by Government.

**Draft Rules**

1. These rules may be called the Bombay District Village Development Fund (1st Amendment) Rules, 2000.

2. In rule 11 of the Bombay District Village Development Fund Rules, 1960, for sub-rule (iii), the following sub-rule shall be substituted, namely :—

" (iii) Making such enquiry as it deems fit, grant to the Village Panchayat 20 times loan and if it undertakes the productive work then 30 times loan of its average of last three years balance of annual income :

[illegible] that :—

(*a*) the amount of loan is available from the fund.

(*b*) the amount of loan and advances given to Panchayats from out of the fund shall not be more than 20 times and if it undertakes the productive work then 30 times of the average of last three years balance of annual income ;

(*c*) the amount of loan does not exceed Rs. 60,000 ;

(*d*) where the amount of loan exceed Rs. 60,000 the Zilla Parishad has given its previous approval to the grant of loans ;

(*e*) the amount to be kept in the Current Account shall not be more than one and half times of the average of last three years withdrawals.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNDA GOSAVI,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner